महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६४ वा | दिनांक : ३१/०३/२०२५ | वार : सोमवार




## लाडकी बहीणमुळे तिजोरीवर भार म्हणून शेतकरी कर्जमाफी होणार नाही - संजय शिरसाट



**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांनी पुढील दोन वर्षे तरी कर्जमाफी मिळणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टच सांगितले. सध्या राज्याची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे या वर्षी पण आणि पुढच्या वर्षी पण घेतलेल्या पीक कर्जाचे पैसे भरा, असे आवाहन अजित पवार यांनी शेतकऱ्यांना केले. आता यावर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी भाष्य केले आहे. लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर राज्याच्या तिजोरीवर ४३ हजार कोटींचा भार आलेला आहे. वाढलेला भार पाहता शेतकरी कर्जमाफी होणार नाही, अशी माहिती असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्याची चर्चा राज्यात सुरु आहे. मात्र, अद्याप राज्य सरकारच्या वतीने तशी कोणतीच घोषणा करण्यात आलेली नाही. अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात तरी शेतकऱ्यांना तसा दिलासा मिळेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र अर्थसंकल्पात देखील शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख करण्यात आला नाही.

अर्थसंकल्पावर आलेला भार ज्या प्रमाणात वाढलेला आहे, त्या अनुषंगाने कदाचित अजित पवार यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार नाही अशी घोषणा केली आहे. लाडकी बहीण योजना आम्ही जेव्हा जाहीर केली त्यावेळी त्याचा असलेला आर्थिक भार जवळपास ४३ हजार कोटींचा आहे. त्यामुळे विकासाची कामं असली तरी त्याची गती मंदावली आहे. म्हणून पुढच्या काळात महसूल कसा वाढेल याकडे सरकारचं लक्ष आहे. महसूल वाढला तर या कामांना गती देता येईल. लाडकी बहीण योजना ही कायम चालू ठेवायला मदत देखील करता येईल, असे संजय शिरसाट म्हणाले.

## दादा क्या हुवा तेरा वादा, वो कसम वो इरादा, जितेंद्र आव्हाडांचा अजित पवारांना टोला



**मुंबई** : बारामती मधील शिवनगर येथील दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड येथे कार्यक्रमावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांनी घेतलेल्या पिक कर्जाचे पैसे ३१ तारखेच्या आज भरण्याचे आवाहन केले. इतकेच नाही तर याच वर्षी काय? पुढच्या वर्षी देखील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसल्याचे त्यांनी थेटच सांगितले. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे. बॉलिवूड चित्रपटातील एका गाण्याचा संदर्भ देत दादा क्या हुआ तेरा वादा? असा सवाल जितेंद्र आव्हाडांनी अजित पवार यांना विचारला आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्याची चर्चा राज्यात सुरु आहे. मात्र, अद्याप राज्य सरकारच्या वतीने तशी कोणतीच घोषणा करण्यात आलेली नाही. अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात तरी शेतकऱ्यांना तसा दिलासा मिळेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र अर्थसंकल्पात देखील शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख करण्यात आली नाही. यानंतर आता अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसल्याचे सांगितले. यावरून विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आहे.

शेतकऱ्यांची इतकी दयनीय अवस्था करून ठेवलीत...पाण्याविना पिके करपून गेलीत. काही भागांत दुष्काळाची परिस्थिती आहे...लोकांना वीज बिल, शैक्षणिक खर्च, इतर वैयक्तिक कर्ज यामध्ये गुरफटून ठेवले आहे... कुठून भरतील कर्ज आणि कुठून आणणार पैसा...? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी सरकारला केला आहे. ते सत्तेत थोडीच आहेत. तुम्हीच आश्वासने दिली होती. शेतकऱ्यांची कर्जे माफ करणार म्हणून. शेवटी जनता म्हणतेय दादा क्या हुवा तेरा वादा... वो कसंम वो इरादा. अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमधून केली आहे.

## शहाजी बापू पाटलांनी गायले नवे गाणे, कुणाल कामराला प्रत्युत्तर देत ठाकरे गटावर केली टीका



**सांगोला** : स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने काही दिवसांपूर्वी एका विडंबन गीतातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नाव न घेता टीका केली होती. या गाण्यानंतर मोठा वाद निर्माण झाला. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्यामुळे संतप्त झालेल्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कुणाल कामराच्या स्टुडिओची देखील तोडफोड केली होती. यानंतर आता काय झाडी, काय डोंगर फेम सांगोल्याचे माजी आमदार शहाजी बापू यांनी देखील या वादात उडी घेतली आहे. शहाजी बापू यांनी देखील एक गाणे गात कुणाल कामराला प्रत्युत्तर देत ठाकरे गटावरही टीका केली आहे. तसेच एकनाथ शिंदे यांचे कौतुक केले.

*मातोश्री के अंगण मे कामरा आया सुपारी लेके गाना गाया, उद्धवजी को खुशी आया लेकीन ठाणे का टायगर आँखो मे अंगार उबाठा को खत्म करणे महाराष्ट्र के मैदान में आया*

असे गाणे शहाजी बापू यांनी म्हटले आहे. कुणाल कामराच्या विडंबनात्मक गाण्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेचे मन दुखावले आहे, त्यामुळे आपण सांगोला येथे कुणाल कामराच्या विरोधात तक्रार दाखल करणार असल्याचेही शहाजी बापू यांनी म्हटले आहे. महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्य करणाऱ्यांना कडक शिक्षा करण्यात यावी, असा कायदा पारित व्हावा यासाठी मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र देणार असल्याचेही शहाजी बापू पाटील म्हणाले.

शहाजी बापू यांनी यावेळी शेतकरी कर्जमाफीवरही भाष्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दरबारी आपले वजन वापरून निधी मिळवून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, अशी मागणी शहाजी बापू पाटील यांनी केली. निवडणूक काळात शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे वचन पूर्ण करावे, आपली फसवणूक झाली, अशी भावना शेतकऱ्यांची होऊ नये, असेही ते म्हणाले.

शहाजी बापू यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर देखील प्रतिक्रिया दिली आहे. अर्थमंत्री अजित पवार हे कधीही खोटे बोलत नाहीत, त्यामुळे त्यांनी तिजोरीची वास्तवता सांगितली आहे. तरीही त्यांनी लाडकी बहीण योजना सुरूच ठेवावी. त्याचबरोबर केंद्रातून निधी आणून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणाही लवकरात लवकर करावी अशी मागणी शहाजी बापू पाटील यांनी यावेळी केली आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ मार्च २०२५


# मनुषत्व तराटुन येण्यास्तव 'युद्ध सुरू आहे' : विद्रोही कवी साहेबराव मोरे




६०त्तर बहिष्कृत जाणीवा प्रगल्भपणे दलित साहित्यात उमटू लागल्यात.धर्मांतरानंतरबुद्धांचा बुद्धी प्रामान्यवादी मार्ग व हजारो वर्षे वर्णाधिष्ठित समाजरचनेत मुद्दामहून गावकुसाबाहेर फेकल्या गेलेला मूकसमाज यांच्यात एक अस्तित्व युद्ध सुरू झाले . बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणरुपी वाघिणीच्या दुधाचं बळ समस्त वंचित समाजाला प्राशन करण्याचा मार्ग दाखवला.मूकसमाजाला त्यांनी बोलते केले, लिहिते केले ,माणसात आणले . आत्मभान जागृत करून प्रस्थापित धर्ममार्तंड समाजासमोर मानवी हक्कांच्या लढ्यासाठी लेखणीच्या संगीनि देऊन उभे केले, त्यापैकी एक लढवय्या शशिकांत हिंगोणेकर होत.'युद्ध सुरू आहे ..'.हा काव्यसंग्रह समीक्षणार्थ वाचताना दलितांतील माणूसपणाची अस्मिता जागवून नवचैतन्य निर्माण होण्या सतत लढत राहिले पाहिजे हा संदेश ठाशीवपणे मांडणी केल्याचे दिसून आले शास्त्र, शस्त्र, लूट या तिघांनाही चौथ्या लाथेने ठोकर मारतो आहे, ही चौथी लाथ म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारी,जे जे माणसाला गुलाम बनवणारे आहे त्याचा पुरजोर प्रतिरोध करणारी दलित साहित्यिकांची सम्यक लेखणी. 'झुंज' कवितेत हा इरादा व्यक्त करतांना कवी लिहितो,"माझी अंतहीन दु:खमी दडवली आहेत माझ्या काळजातील कोठारात सुरुंगासारखी"असाच दु:खद हुंकार त्र्यंबक सपकाळे यांनी सुरुंग काव्यसंग्रहात प्रकट केलेला आहे.हिंगोणेकरांची कविता आपल्या ज्ञाती बांधवांना नेहमी सशस्त्र रहावे लागेल यासाठी आवाहन करते,या अनुषंगाने एक वेगळ्या लेव्हलला हा आत्मलढा न्यावा लागणार आहे,याची जाणीव कविला आहे .'लढाई' ह्या शेवटच्या कवितेतून शिकून सवरून स्वयंघोषित सिद्ध झाल्या पुढाऱ्यांच्या फितूर वृत्ती विरोधात लढाई पुकारताना ते लिहितात,"बाबासाहेब तुमचे प्रकाशाचे बेटयांनी चक्क गहाण ठेवले आहे .माणसाचे गळे कापणार्या जल्लांदाकडे"आज बाबासाहेबांच्या भाबड्या अनुयायांना शे-पाचशे साठी आमचे उपटसुंभ नेते निवडणूकीत जातीयवादी पक्षाच्या दावणीला बांधतात हे विदारक वास्तव शशिकांत यांना अस्वस्थ करते, उमेदीच्या चळवळीला अशा नतभ्रष्ट वृत्तीमुळे धका बसतो.परंपरा, अनिष्ट रूढी - रिवाजाविरोधात पेटुन उठणारी तरुणांची लढाई ऐन निर्णायक क्षणी पुढार्यांच्या लंपट तहनीतीमुळे फोल ठरते"लढाईचा ध्वज आकाशात उंचावत गर्जना करणारे गर्जनांसहित गाडीत जाऊन बसलेतेव्हा मैदानातलेहातातल्या शस्त्राकडे पाहतच राहिले "(धक्का)इथली शोषण व्यवस्था अशा फुटीरवाद्यांमुळे अधिकाधिक बळकट होताहे. पिडित तेच. पिडकांची शोषक वृत्ती दररोज नवीन रूप धारण करते आहे .सामाजिक संरचनेत बदलाबरहुकूम छळण्याचे संदर्भ तेवढे बदलले, शोषण व्यवस्था तीच आहे ."किती दिवस" मध्ये कवी पोटतिडकीने इथल्या नैतिक अध:पतधन होत चालल्या व्यवस्थेला कुसळागत बोलणारा प्रश्न विचारतात, "या इथल्या व्यवस्थेतकिती दिवस जगावे शोषिक होऊन.त्यांची घरे सजलेली आहेत माझ्या रक्ताचे सडे सांडून"आमच्या आईबापांच्या घामातून अभिजनांची संसारवेल मांडवाला चढते,आमची माय बहिण मात्र घोटभर पाण्यासाठी वणवण भटकत असते. हे जे शोषणाचे केंद्रबिंदू आहे ते एकजूट होऊन धस्त करावेच लागेल हा दुर्दम्य आशावाद हिंगोणेकर संयतपणे व्यक्त करतात तेव्हा त्यांचा गौरव अटळ ठरतो."एकदिवस नक्कीच हजारो हातांच्या धगधगत्या मुठीविनाशाचे केंद्रबिंदूच उध्वस्त करतील"(इथून पुढे...)माझी जन्मभूमी कुठे आहे?,माझे हक्कांचे, स्वाभिमानानचे समतापीठ कुठे आहे?,नेमका माझा देश कोणता? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधार्थ अंधभक्त शासनाच्या असंवेदनशील भोंगळ कारभारामुळे माझा गळा घोटला जातोय.' माझं स्वातंत्र्य?' कवितेतून सर्वहारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारा प्रश्न कवी शशिकांत सडेतोडपणे विचारतात "कुणी विद्रुप केलाय माझ्या डोळ्यातलास्वातंत्र्याचा चेहरा?"संग्रहात काही चळवळीच्या कविता आहेत, कवी शिक्षण विभागात उच्च पदस्थ अधिकारी असल्याने त्यांचा जनसंपर्क व जनतेसोबतचा अनुभवाचा कॅनव्हास विस्तृत आहे.एक शिस्तप्रिय अधिकारी व हाडाचा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता म्हणून आलेला भीषण विदारक अनुभव,"आपल्या शिवाय कुणीही या व्यवस्थेलासुरूंग लावण्याचा मनस्थितीत नाहीय.आपले सारे मनसुबे जमीनदोस्त कसे होतील यासाठी त्यांच्या यंत्रणा सज्ज आहेत सर्वत्र "परंपरेने लादलेल्या अमानवी अत्याचारपिडितांचे प्रतिनिधित्व करणारे हे निर्णायक युद्ध सुरू झाले आहे, या अर्थी ही आक्रंदनाची कविताआहे. ठायी ठायी विद्रोहाची ज्वाला प्रज्वलित ठेवण्याचा मानस स्पष्ट दिसतो, "आता सांगू नये कुणाही उद्ध्वस्त कहाणी शस्त्रे उपसोनी गावी विद्रोहाची नवी गाणी "कवी शशिकांत यांना आंबेडकरीविचार_, परिवर्तन चळवळीची शिदोरी वारसाने मिळाली आहे,ते तिसऱ्या पिढीतील लक्षवेधी कवी आहेत.बाबासाहेबांनी दिलेला मानवतेचा जाहिरनामा, लोकशाही मूल्ये जात्यांध, धर्मांच्या नावावर दम तोडत आहे.संविधान वाचवण्यासाठी हा बुलंद आवाज दलित साहित्यातून गोचर होतो आहे, ही चिवट झुंज गाफील राहून लढणं आत्मघात ठरणार आहे या देशात मानसाला श्वास घेण्यासाठीही भिती वाटते अशी अवस्था झाली आहे ही बोच कवी व्यक्त करतो,"त्यांचे हात गुंतले आहेत पुन्हा नव्या अंधार कोठड्या निर्मितीतत्याआधी आपल्याला हे बंद दरवाजे उघडून फेकले पाहिजे "संग्रहात ५७ कवितांचा अंतर्भाव केलेला आहे विचारवंत रा.गजाधव यांची पाठराखण उद्याच्या आत्मसंगराची जाणीव करून देते गुरुवर्य गंगाधर पानतावणे यांची सर्वव्यापी प्रस्तावना दलित कविता, स्वरूप व भविष्यातील भूमिके विषयी दिशादर्शन करणारी असुन काव्यसंग्रहाची साहित्यिक उंची वाढविणारी आहे भ. या. परसमाळे यांचे मुखपृष्ठ वर्तमानातील युद्ध हे शक्ति व युक्ती यांच्या संयोगाने लढणेच अपरिहार्य असल्याचे सूचन करते.रेखाटने, काव्याशय दृगोचर करणारी आहेत सुविद्या प्रकाशनाने वाचनीय व आकर्षक सुबक मांडणी असलेला काव्यसंग्रह वाचकांच्या हाती सुपूर्त केला आहे माणसाच्या जगण्याला प्रतिष्ठा लाभून मनुष्यत्व तरारून येण्यासाठीचे युद्ध सुरू आहे..... शेवटच्या माणसाला मनुष्यत्व प्राप्त होईपर्यंत. सन्मित्र कवी शशिकांत हिंगोणेकर यांच्या दमदार साहित्यनिर्मिती साठी शुभेच्छा व्यक्त करतो.

**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
**९४०४०४८६०१**
**युद्ध सुरू आहे : काव्यसंग्रह**
**कवी : शशिकांत हिंगोणेकर**
**सुविद्या प्रकाशन, पुणे**
**किंमत : १०० ₹**

# मंगरूळपीर तालुक्यातील ३१ ग्रामपंचायत प्रधानमंत्री टीबी मुक्त पुरस्काराने सन्मानित




**वाशिम (महेश मुंढे) :** प्रधानमंत्री टीबी मुक्त ग्राम पंचायत गौरव सोहळा आज दिनांक २४ मार्च २०२५ रोजी पंचायत समिती सभागृह मंगरूळपीर येथे आयोजित करण्यात आला होता. जिल्हाधिकारी भुवनेश्वरी,मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ रेश्मा पाटील, डॉ.सतिश परभणकर वैद्यकीय अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद्र वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत पडताळणी पात्र झालेल्या ग्रामपंचायत चा तालुकास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी श्रीराम कुलकर्णी गटविकास अधिकारी पंचायत समिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ.धनश्री जाधव ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर HIV विभाग आडे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्राप्त ग्राम पंचायतला प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, संबंधित ग्रामपंचायतीतील कर्मचारी , वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका,आशा स्वयंसेविका, वादी प्रतिनिधींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मंगरूळपीर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन सांगितले की या टी.बी मुक्ताच्या लढ्यामध्ये प्रत्येक सज्जनांचे योगदान गरजेचे आहे. आपल्या समुदायातील टी.बी रुग्णांना सहानुभूती समुपदेशन आत्मसन्मानाची वागणूक देऊन योग्य उपचारासाठी प्रेरित करून त्याला टी.बी मुक्त करण्यासाठी प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगितले.तालुक्यातील ७६ ग्रामपंचायत पैकी ३१ ग्रामपंचायतींना प्रधानमंत्री टीबी मुक्त* ग्रामपंचायत चा बहुमान प्राप्त झाला, यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक विनोद श्रीराव,गणेश रघुवंशी,संतोष बल्लाळ, दत्ता माहुलकर,सांख्यिकी सहाय्यक प्रमोद उगले,लेखापाल जितेश वर,रिना शिंदे,डॉ.प्राची घोरपडे,रोशनी मांडे, मुहम्मद अफजल,सोनिया भगत,शिपाई भिमटे,पि.पि.एस.एय क्षेत्रकार्य अधिकारी प्रदिप पट्टेबहादूर, गट प्रवर्तक यांची मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष बल्लाळ यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका आरोग्य अधिकारी डॉ.धनश्री जाधव यांनी केले.सर्वांचे आभार गणेश रघुवंशी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ मार्च २०२५


## ज्ञानेश संगीत विद्यालय, गायन स्पर्धेत भाग्यश्री वाकळे प्रथम



**कन्नड (अरुण थोरात):** ज्ञानेश संगीत विद्यालय आयोजित ऑनलाईन गीत संगीत गायन स्पर्धेत कळंकी ता.कन्नड येथील प्रसिद्ध बालगायिका भाग्यश्री नारायण वाकळे हिने उत्कृष्ट गीत गायन करित तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला आहे.ज्ञानेश संगीत विद्यालयाचे, संगीत महोत्सवाचे हे अकरावे वर्ष आहे. यानिमित्त ही गीत गायन स्पर्धा आयोजित केली होती. यात राज्यभरातील अनेक गायक कलावंत सहभागी झाले होते. यात भाग्यश्री ने प्रथम क्रमांक मिळविल्याने तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. भाग्यश्री वाकळे ही अतीदुर्गम भागात वसलेल्या कळंकी गावातील असून तीचे वडील ह.भ.प.नारायण महाराज वाकळे हे महाराष्ट्रातील एक नामवंत भागवताचार्य, किर्तनकार आहेत. आपल्या किर्तन सेवे बरोबरच त्यांनी अनेक नविन किर्तनकार घडविले आहेत. भजन, किर्तन, संगीत साधनेचा वारसा लाभल्याने भाग्यश्री राज्यभरातील अनेक कार्यक्रमात सहभागी होऊण कन्नड तालुक्याचा नावलौकिक वाढवित आहे. ज्ञानेश विद्यालयाच्या वतीने तीचा सन्मानपत्र देऊण गौरव करण्यात आला.

याप्रसंगी तुकाराम गायके, मंगेश निकम, डॉ. संगिता नांदुरकर मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर, डॉ. महाडिक, डॉ. राजगुरू, डॉ. मापारि, डॉ. शहा, हभप पुरुषोत्तम महाराज पवार, स्वामी सर्वेश्वरानंद आदी सह बाल गायक, वादक, स्पर्धक, पालक व संगीत रसिक उपस्थित होते.






## शेतकऱ्यांनी पिक कर्ज भरू नये ; रयत क्रांती संघटना युवती प्रदेशाध्यक्ष प्रिया राऊत यांचे आवाहन



**वाशिम (महेश मुंढे) :** राज्य सरकारने चालु हंगामात सोयाबीन करीता ४८९२ रूपये msp ठरविली होती मात्र संपूर्ण राज्यात सोयाबीन विक्री हि ३३०० ते ४००० या याचं प्रमाणे झाली आहे आणि आजही होत आहे, राज्यात किमान २५ लाख एकरमध्ये सोयाबीन उत्पादन घेतल्या जाते शेतकऱ्यांना सरासरी एकरी चार क्विंटल उत्पन्न होते. प्रत्येक क्विंटलवर एक हजार दर कमी मिळाला आहे व आज रोजी सुद्धा तोच दर मिळत आहे राज्यात सोयाबिनला कमी दर मिळाल्यामुळे व सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना msp हा वचननामा न पाळल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सरकार यांचे कडूनच ५ हजार कोटी रुपये परत घ्यायचे आहे व इतर पिकांचा विचार केला तर, प्रत्येक पिकांना msp पेक्षा कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना देणे नसुन घेणे आहे त्यामुळे पीककर्ज भरू नये व आत्महत्या सारखे टोकांचे पाऊल उचलण्याचा विचार मनात येऊ देऊ नये असे आवाहन रयत क्रांती संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा प्रिया राऊत यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# कन्नडची तिफण पोहचली आता राष्ट्रीय पातळीवर...




२००९ मध्ये बलिप्रतिपदेला बळिराजा ला वंदन करून त्रैमासिक तिफणचा श्री गणेशा कन्नड सारख्या ग्रामीण दुर्गम व डोंगराळ भागातून झाला. कुठल्याही प्रकारचे सहाय्य नसतांना अतिशय मेहनतिने तिफण ची वाटचाल झाली. डॉ. हुसे हे शेतकरी कुटूंबातून आलेले मराठीचे प्राध्यापक आहेत. तिफण हे कृषकांचे प्रतिक घेवून डॉ. हुसेनी मराठवाड्याच्या सुपिक मातीत अक्षर पेरणी केली आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश आदी भागात तिफणने आपला लेखक वाचक वर्ग निर्माण केला आहे. या वाटचालीत अनेक उपक्रम राबविले, आज तिफण विविध माध्यमातून समाज मनाची मशागत करीत आहे. आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांची च शस्त्रे यत्न करू या न्यायाने तिफण प्रसिद्ध होत आहे. तिफण लेखक वाचक जोडो अभियान, तिफण लेखक वाचक मेळावा, पुस्तक प्रकाशने, काव्यलेखन कार्यशाळा, कविसंमेलने, कविकट्टा, पुस्तक प्रदर्शन, तिफण कविता महोत्सव, तिफण पुरस्कार, तिफण साहित्य सन्मान पुरस्कार, तिफण राज्य काव्य पुरस्कार, तिफण वाङ्मयीन पुरस्कार, तिफण राष्ट्रीय चर्चासत्रे, तिफण संवाद अशा किती तरी उपक्रमातून तिफण ने मायमराठी ची सेवा केली आहे. २५ पेक्षा अधिक नाविण्य पूर्ण विषयावर विशेषांक प्रसिद्ध करून मोलाची भर घातली फार मोठा दस्तऐवज उपलब्ध करून दिला आहे. सर्वच विशेषांक दखल पात्र ठरले. नदी विशेषांक, ऊसतोड कामगार विशेषांक, झाडी पट्टी रंगभूमी विशेषांक, बोली भाषा विशेषांक,, मराठवाड्यातील साहित्य विशेषांक, भाषा, साहित्य संस्कृती विशेषांक, आदिवासी विशेषांक, छ. शिवाजी महाराज विशेषांक, यशवंतराव चव्हाण विशेषांक, मूर्ती , कला व स्थापत्य विशेषांक, लोककला विशेषांक, लोक साहित्य विशेषांक , कविता विशेषांक आणि आता कथा विशेषांक वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. तिफणने आपला एक स्वतंत्र लेखक वाचक वर्ग निर्माण केला आहे. तिफण हे आता लिहित्या हाताचे व्यासपीठ झाले आहे. तिफण केवळ एक मासिक नसून ती एक वाङ्मयीन चळवळ झाली आहे. तिफणने अनेकांना संपादक मंडळावर घेतले. आता राज्यासह देशभरातील अभ्यासक, लेखक, वाचक तिफणशी जोडले गेले आहे. मॉरिशस, कर्नाटक, गोवा, हैद्राबाद, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, अशा देशाच्या विविध भागात तिफणने आपला लेखक वाचक वर्ग निर्माण केला आहे. तिफणची ही अक्षर पेरणी आता भारतभर होत आहे. कन्नडची तिफण आता देशपातळीवर पोहोचली आहे. या वाटचालीत अनेकांचे सहकार्य, पाठबळ व मार्गदर्शन असल्याचे तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे सांगतात.तिफण प्रकाशन, तिफण वाचक चळवळ, तिफण डिजिटल, तिफण फेसबुक पेज, तिफण वेब पोर्टल, तिफण बोली व भाषा संशोधन प्रशिक्षण केंद्र, सानेगुरुजी अनुवाद केंद्र, तिफण बाल साहित्य सभा, संत भगवान बाबा अध्यासन केंद्र, तिफण सखी मंच अशी आता तिफणची केंद्रे झाली आहेत. भविष्यात तिफणला मोठे काम उभे करायचे असा डॉ. हुसे यांचा मनोदय आहे . मुलभूत काम तिफणच्या माध्यमातून होत आहे. कन्नडचे नाव तिफण ने आता राष्ट्रीय पातळीवर नेले आहे. हा कन्नड तालुक्याचा, डॉ. शिवाजी हुसे ज्या महाविद्यालयात प्राध्यापक आहे त्या शिवाजी महाविद्यालयाचा आणि तमाम शेतकरी मायबापांच्या मुलांचा सन्मान आहे. उद्या कदाचित हीच कन्नड च्या भूमितील तिफण सातासमुद्र पार करून आंतरराष्ट्रीय पातळीवर ही पोहचेल. तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे आणि त्यांना पाठबळ देणारे सर्व मार्गदर्शक, लेखक - वाचक यांच्या सामुहिक प्रयत्नाचे हे यश आहे. तिफण ची आता वेबसाईट तयार होत असून नवबदलासह, नव्या सहकाऱ्यासह देशभर अक्षरपेरणी करण्यास आता कन्नडची ही तिफण सज्ज झाली आहे. समस्त भूमिजनांची ही तिफण आहे. तिफणच्या पुढील अक्षर वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !कन्नडचे तिफण परिवाराचे युवा कवी ज्ञानेश्वर गायके यांनी तिफणच्या वाटचालीवर व तिफणच्या कार्याचा - आली तिफण धावून या कवितेतून यथार्थ गौरव केला आहे. - आली तिफण धावून..

- कवी ज्ञानेश्वर गायकेभूमीजनाच्या हाकेला,आली धावून तिफणमाळरानी बरडात, गेली अक्षर पेरून.सुरू अक्षर पेरणी, बलिप्रतिपदा येता हर्ष तिफणकाराला,पीक हिरवे उगता. जग पोशिंदा वाचावा, नवा विचार रुजावासृजनाच्या सोहळ्यात,वारकरी हा भिजावा. नव्या लिहित्या हातांनी, पेर घामाची करावीमोत्यापरीस कविता,काळ्या भुईत उगावी.आस मनी तिफणची, इडा पिडा रे टळावी नवी पहाट बळीच्या,ओंजळीत रूजवावी.विशेषांक घरोघरी,दिवाळीस भेट द्यावी सुखनेच्या मुखातून, कवितेची ओळ यावी.शब्दाचीच शस्त्रे आता, लढण्यास सिद्ध व्हावीजग बदलण्यासाठी, नित्य लेखणी झिजावी.अशी तिफण आमची, थेट दिल्लीला भिडतेकष्टकरी वेदनेचा, उरी सन्मान जपते.शेती, माती आणि शेतकरी मायबापांशी इमानी राहून ही तिफण ची घोडदोड सुरू आहे. सोळाव्या वर्षात तिफण सिद्ध , प्रसिद्ध झाली आहे. अनेक खेड्यापाड्यातील लेखक कविंना तिफणने व्यासपीठ दिले आहे. त्यांच्या लेखणीचा यथोचित सन्मान केला आहे. तिफण ही आता लिहित्या हाताची एक अक्षर चळवळ झाली आहे.शेतकरी, शोषित आणि वंचितांच्या व्यथा वेदनेला शब्द देणाऱ्या तिफणकार डॉ. शिवाजी हुसे या भूमिनिष्ठ भूमिजनांच्या भूमिकेला व त्यांच्या अक्षर कार्यास अंत:करण पूर्वक शुभेच्छा !

**डॉ. सुखदेव इघारे**
**छत्रपती संभाजीनगर**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ मार्च २०२५


## जेईएस महाविद्यालयात दोन दिवशीय क्रीडा व शारीरिक शिक्षण विषय राष्ट्रीय परिषदेचा समारोप कार्यक्रम

### युवा खेळाडूंनी छोट्या व आवडीच्या खेळात सराव व परिश्रम घेऊन खेळल्यास यश निश्चित मिळेल. -प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री.



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** युवा खेळाडूंनी छोट्या व आवडीच्या खेळात नियमित सराव व परिश्रम घेऊन खेळल्यास निश्चितच जीवनात यश मिळेल असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे आयोजित क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध या राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले.

जेईएस महाविद्यालयच्या क्रीडा विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर तसेच शारीरिक शिक्षण संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध बाबत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.२८ ते २९ मार्च २०२५रोजी करण्यात आले होते . समारोप समारंभाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजी नगरचे एमपी लॉ कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. देशमुख होते, व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.महावीर सदावर्ते, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. राजेंद्र सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ.हेमंत वर्मा यांनी केले असून महाविद्यालयात तिसरी राष्ट्रीय परिषद व चर्चासत्र असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत जेईएस महाविद्यालयाच्या खेळाडूंनी अनेक खेळांमध्ये राष्ट्रीय व राज्य स्तरावर नावलौकिक कमावला आहे. महाविद्यालयाचा क्रीडा विभाग त्यांना नेहमीच प्रोत्साहित करत असतो. दरवर्षी आर्चरी या खेळामध्ये महाविद्यालयाची कामगिरी उल्लेखनीय असते, असेही डॉ वर्मा यांनी सांगितले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, युवकांनी छोट्या छोट्या खेळांपासून सुरुवात करावी, आपला कल व आवड ओळखून पुढे त्या खेळाच्या क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करावे. युवा खेळाडूंनी कठोर परिश्रम घेतल्यास व नियमित सराव केल्यास निश्चितच यश प्राप्त होते. यावेळी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कॅप्टन महेंद्रसिंग धोनी यांचे उदाहरण त्यांनी सांगितले . सुरुवातीला ते फुटबॉल खेळत होते नंतर क्रिकेटकडे वळले, या खेळाची सुरुवात त्याने कठोर परिश्रम करून केली असून, चांगल्या प्रकारे खेळून, पुढे तो भारतीय संघाचा कर्णधार होऊ शकला ,त्याने भारताला विशेष असा बहुमान मिळून दिला.आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट क्षेत्रात स्वतःचे नाव कमावून देशालाही नावलौकिक प्राप्त करून दिला.महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास व परंपरा त्यांनी सांगितली ,या महाविद्यालयात अनेक राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू होऊन गेल्याचे सांगून, यापुढेही दरवर्षी शारीरिक शिक्षण विभागातर्फे राष्ट्रीय क्रीडा व शारीरिक शिक्षण राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाईल, असेही डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी शोधनिबंध सादर करणाऱ्या खेळाडू व प्राध्यापकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशातील संशोधक विद्यार्थ्यांनी ~प्राध्यापकांनी ऑनलाइन व ऑफलाईन ८२ शोधनिबंध सादर केलेत. या समारोप कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय परिषदेत सहभागी खेळाडू , प्राध्यापक, क्रीडा शिक्षक, योगा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेईएस महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा यांनी केले, तर उपस्थिताचे आभार महाविद्यालयाचे माजी खेळाडू प्रा. सुमित आम्लेकर मानलेत. ही राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. किशोर बिरकायलू ,प्रा. राहुल सारस्वत, डॉ.प्रवीण चंदनशिवे, डॉ. बी जे श्रीरामे, श्री सौंदर, श्री.क्षीरसागर सेवक श्री विलास बोधले, श्री धर्मेंद्र आंबट, श्री साईनाथ, श्री राजेश दौड, श्री बबलू टेकाळे, श्री. गोविंद साखरे, शामराव राठोड व महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे खेळाडू आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## अ.भा. छावा संघटनेच्या निवेदनाची दखल : तहसील कार्यालयात होणार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था



**सिंदखेड राजा (महेश मुंढे) :** दिनांक २६ मार्च रोजी अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न “दैनिक विदर्भ दस्तक” शी संवाद साधताना त्रिव संताप व्यक्त केला होता त्या संदर्भात दिनांक २७ मार्च रोजी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले त्या क्षणी तहसीलदार यांच्याशी निवेदन देण्यापूर्वी निवेदनात नमूद मागण्या तात्काळ मान्य करा,गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांसाठी पिण्याची पाण्याची व्यवस्था नाही,वृद्ध नागरिकांची पाण्याअभावी तहसील कार्यालयात गैरसोय होत असल्याचे छावा संघटनेच्या निदर्शनास आल्यामुळे,भविष्यात निर्माण होणाऱ्या गंभीर बाबींवर लक्ष देऊन उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.आपण याची दखल घ्यायला हवी होती परंतु का घेतली नाही आता तर उष्णतेचा पार चढत असल्याने नागरिकांची पिण्याच्या पाण्याअभावी गैरसोय होत आहे यावर अशोक राजे जाधव यांच्याशी चर्चेदरम्यान तहसीलदार यांनी तात्काळ मागणी मान्य करून उद्यापासून तहसील कार्यालयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित होणार नाही हा शब्द दिला असल्याने आपण या प्रकारे जनहीताचे व जनसामान्यांचे तात्काळ प्रश्न सोडवाल हीच अपेक्षा अशोक राजे जाधव यांनी छावा संघटनेच्या वतीने व्यक्त केली.छावा संघटनेच्या निवेदनाची दखल घेतल्यामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. निवेदन देतांना जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांच्या सह कृष्णा कोल्हे जिल्हा कार्याध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,बाळासाहेब शेळके विधानसभा अध्यक्ष अखिल भारतीय छावा संघटना मातृतीर्थ सिंदखेड राजा,रफीक सैय्यद प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय छावा संघटना बुलढाणा,नारायण मस्के सोशल मीडिया प्रमुख देऊळगाव राजा अखिल भारतीय छावा संघटना पत्रकार अनील दराडे पत्रकार संपादक नयानेशवर बुधवत यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.





**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३१ मार्च २०२५


## माधवराव पाटील महाविद्यालयात पदवीदान समारंभ थाटात संपन्न



माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांना पदवीदान प्रसंगी पदवी प्रदान करताना डॉ. अशोक सपाटे, चंद्रकांत बिराजदार, नरसिंग कदम, महेश मोटे, रवींद्र गायकवाड व अन्य.

**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर व माधवराव पाटील महाविद्यालय परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सन २०२३-२४ पदवीदान समारंभ शनिवारी (ता. २९) रोजी थाटात संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरसिंग कदम, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. महेश मोटे, वाणिज्य अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड होते. प्रारंभी माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध शाखेच्या शंभरहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पदव्या देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. बिराजदार यांनी दिला यशस्वी वाटचालीचा विद्यार्थ्यांना मंत्र. विद्यार्थ्यांनी आपल्या यशात गुरुजनांचा वाटा असल्याचे सांगून कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्ष समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे म्हणाले की, विद्यार्थ्यांना मिळालेल्या पदवीचा अतिशय दक्ष राहून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वासाठी आणि समाजासाठी उपयोग झाला पाहिजे. आपण मिळवलेल्या पदवीचा मान-सन्मान राखून सामाजिक बांधिलकीच्या भावनेने त्याचा सदुपयोग करावा. वाणिज्य अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. विनायक रासुरे, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. विलास खडके, डॉ. शिला स्वामी, डॉ. संध्या डांगे, डॉ. सुजित मटकरी, डॉ. सुभाष हुलपल्ले, आनंद वाघमोडे, राजानंद स्वामी आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नरसिंग कदम यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राम बजगिरे तर आभार प्रा. डॉ. अरुण बावा यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साई संस्थांची मोठी घोषणा भक्तांना मिळणार पाच लाखापर्यंत विम्याचे संरक्षण



**शिर्डी :** येथे साईबाबांच्या दर्शनासाठी दरवर्षी देशभरातून लाखो भाविक येत असतात. मात्र, अनेक वेळा दर्शनासाठी येताना किंवा परत जात असताना भाविकांना छोट्या-मोठ्या दुर्घटनांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर साई संस्थानने गुढी पाडव्याच्या दिवशी साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता साईभक्तांना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय शिर्डीतील साई संस्थानच्या वतीने घेण्यात आला आहे.

या विमा संरक्षणाचा लाभ घेण्यासाठी साई भक्तांना दर्शनाला येण्याआगोदर साई संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर आपली नोंदणी करणे बंधनकारक आहे. घरातून निघाल्यानंतर ते साई मंदिरात दर्शन घेईपर्यंत कोणतीही अप्रिय घटना घडल्यास संबंधित व्यक्तीला किंवा त्याच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण दिले जाणार आहे. याबाबत साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी म्हटले की, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येणार आहे, त्याच्यासाठी पाच लाखांचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यात अट अशी आहे की, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येईल, त्यांनी दर्शनाला निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानची ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे भक्त साईबाबांच्या दर्शनासाठीच येत आहे, याची ओळख पटण्यास मदत होईल. जे फक्त नोंदणी करून येतील, त्यांचा विमा उतरवला जाणार आहे. सर्व साई भक्तांना यानिमित्त मी विनंती करत आहे की, आपण निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानच्या ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखेच्या वतीने जागतिक रंगभूमी दिन साजरा करण्यात आला




**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक रंगभूमी दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना आसिफ अन्सारी लिखित छत्रपती शिवाजी महाराज कोणाचे ?, कस्तुरी, भेट, उस्मान ची आई या बालनाट्य पुस्तकाचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले तसे गुलजार बालनाट्यसंग्रहाचे वाटप शिक्षकांना करण्यात आले. शहरातील आयकॉन इंग्लिश स्कूल ज्योती नगर या शाळेतील १९० विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक नियोगी सर, नियोगी मॅडम, शिक्षक अरविंद बगाटे, राहुल बनकर, वेदा घोटनाका, अंजली पवार, वसुंधरा देशमुख , चारुशीला ढोबळे , सीमा गाडगीळ, मीना कुलकर्णी, राधिका गुगली, तृप्ती कुलकर्णी, महिमा शहा, जोसेफ शाह, भाग्यश्री चव्हाण, भाग्यश्री बोडके, कविता, प्राजक्ता या शिक्षकांनी आवडीने बालनाट्याची वाचनाकरिता पुस्तके घेतली. या ठिकाणी कार्यक्रमाचे संचालन गोकुळ गायकवाड यांनी केले.किड्झोन इंग्लिश स्कूल, पुंडलिक नगर छत्रपती संभाजीनगर शाळेतील १५० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना धायतडक सहाय्यक शिक्षिका अनिता संकलेचा याविषयी अनेक शिक्षक उपस्थित होते या कार्यक्रमाचे संचलन आमेर शेख यांनी केले.मातोश्री नरसाई प्राथना प्राथमिक व माध्यमिक शाळा, न्याय नगर, छत्रपती संभाजीनगर शाळेतील ११० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली.




यावेळी माध्यमिकचे मुख्याध्यापक श्री ढोके, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिंदे , व सहशिक्षक श्री वाघमारे एस. आर, श्री पैठणकर के. व्ही, श्री बिरादार आर. वी, श्री जे. बी. कवडे, श्री मेळकुंदे सर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाल्मीक जाधव यांनी केले. परिषदेतर्फे प्रथमच देवगाव रंगारी तालुका कन्नड या या ठिकाणी ही कार्यक्रमाचे आयोजन केले होते गावातील समर्थ व्यंकटनाथ पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी विविध बालनाट्याची पुस्तक वाटप करण्यासाठी बालरंग भूमी परिषदेचे सदस्य लक्ष्मण अहिरे यांनी शाळेचे संस्थाचालक मा वैदय सर यांच्याकडे पुस्तके सपूर्द केली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक .जोशी मॅडम शिक्षक वर्ग उपस्थित होते. लवकरच विद्यार्थ्यांसाठी देवगाव रंगारी येथे सुट्ट्यांमध्ये नाट्य शिबिर व व्यक्तिमत्व विकास हा कार्यक्रम घेण्यात येईल असे परिषदेच्या वतीने कळविण्यात आले आहे.शहरातील मराठवाडा कामगार ग्रंथालय गुलमोहर कॉलनी एन 5 सिडको या ठिकाणी संध्याकाळी बालनाट्य पुस्तक वाटप आणि बाल सभासद नोंदणीचा कार्यक्रमाची सांगता झाली या ठिकाणी राम रमेश सोळंके आणि जगन्नाथ सोळंके यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमाची सांगता असे पण सारी लिखित सावळ्या या एकांकिकेचे अभिवाचन हे वाल्मीक जाधव आणि गोकुळ गायकवाड यांनी केले.